N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** नागपुर शहर **P.S.(ठाणे):** सदर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0280 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 11/06/2026 06:18

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन
   **Time Period (कालावधी):**
   **Date From (दिनांक पासून):** 09/04/2026
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 10/06/2026
   **Time From (वेळेपासून):** 14:30 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 16:51 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 10/06/2026 **Time (वेळ):** 19:59 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 010
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 11/06/2026 05:10 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 2.5 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन,प्राधीकरण नागपूर यांचे कक्ष,नागपूर शहर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): -सरतर्फे श्री जितेंद्र नामदेवराव वैरागडे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1986

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पोलीस निरीक्षक लाचलुचपत ,प्रतिबंधक विभाग, नागपूर,सदर,नागपुर शहर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पोलीस निरीक्षक लाचलुचपत,प्रतिबंधक विभाग ,नागपूर शहर,सदर,नागपुर शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय): पोलीस अधिकारी

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9420178674

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री सुभाष बबन भुजबळ मुख्य अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण नागपूर | | | 1. जिवनधारा गेस्ट हाऊस,,सुट क्र 02 फुटाळा तलावाजवळ,विभाग महाराष्ट्र जिवन प्राधिकर,नागपूर अंबाझरी ,नागपुर शहर,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रानिक सामान | ध्वनी उपकरणे | 6 मेमोरी कार्ड | 0.00 |
| 2 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रानिक सामान | मोबाईल फोन | 3 अँपल कंपनीचे स्मार्टफोन | 0.00 |
| 3 | कागदपत्रे आणि मुल्यवान रोखे | इतर कोणतीही कागदपत्रे | तक्रारदार यांचे कामासंबंधीचे कागदपत्राच्या झेराक्स प्रतीन | 0.00 |
| 4 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | लाचरक्कम 30,000/ रुपये. | 30,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

30,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद

लाचलुचपत प्रबिंधक विभाग
दिनांक:-11.06.2026

मी जितेंद्र नामदेवराव वैरागडे, वय 40 वर्ष, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नागपूर मो. क्र. 9420178674 शासनातर्फे फिर्याद देतो कि, दिनांक 09.04.2026 रोजी लाचलुचपत प्रतिबधक विभाग, कार्यालय झिरो माईल नागपूर येथे दैनंदिन कामे करीत हजर असतांना वेळ 10.30 वाजता सुमारास श्री. राजीव कर्मलवार, वाचक पोलीस निरीक्षक ला.प्र.वि. नागपूर यांनी फोन करुन त्यांचे कार्यालय 2 रा माळा, प्रशासकिय इमारत क्र. 1 सिव्हील लाईन नागपूर येथे बोलावुन तक्रारदार श्री. अरविंद डोमाजी निकोसे वय 56 वर्ष,व्यवसाय- कॉन्ट्रॅक्टर, रा. प्लॉट क्र. 120, विक्रमशिलानगर,वर्धा जि. वर्धा यांची भेट करुन दिली व त्यांची लोकसेवकाविरुध्द लाच मागणी संबधाने तक्रार असल्याबाबत कळवुन त्यांची तक्रार घेवुन योग्य ती कायदेशिर कार्यवाही करणेबाबत मा. पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. नागपूर यांनी आदेशित केले आहे. नमुद तक्रारदार यांना आम्ही आमचे कार्यालय लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कार्यालय झिरो माईल नागपूर येथे घेवुन आलो. त्यांनी आम्हास एका लोकसेवकांविरूध्द तक्रार असल्याचे सांगितले. व त्यांनी हस्तलिखीत तक्रार सादर केली. सदर तक्रारीवर आम्ही समक्ष म्हणून सही केली.

त्यानंतर लाच रक्कम मागणीची पडताळणी व सापळा कार्यवाहीसाठी 2 शासकीय पंचाची आवश्यकता असल्याने आम्ही आमचे कार्यालयातील पोलीस अंमलदार प्रफुल भातुलकर यांना 12.00 दरम्यान मा. राज्यकर सहआयुक्त (ऑ डीट), जी.एस.टी. कार्यालय, सिव्हिल लाईन्स, नागपूर यांना पत्र देऊन वर्ग- 2 चे दोन शासकीय अधिकारी/कर्मचारी पंच म्हणुन काम करण्यास उपलब्ध करुन देण्याबाबत विनंती पत्र देवुन रवाना करण्यात आले. त्यानुसार मा. राज्यकर सहआयुक्त (ऑ डीट), जी.एस.टी. कार्यालय, सिव्हिल लाईन्स, नागपूर यांनी त्यांचे कार्यालयातील उपरोक्त अधिकारी यांना पंच म्हणुन उपलब्ध करुन दिले असुन नमुद पंच आमचे कार्यालयात वेळ अनुक्रमे 14.30 वा. हजर आले. पोलीस अंमलदार प्रफुल भातुलकर यांनी त्यांचेसोबत आलेल्या दोन शासकीय कर्मचारी यांची ओळख आम्हास करुन दिली. आम्ही आमची दोन्ही पंचांना ओळख करून देऊन, आम्ही दोन्ही पंचांना सांगितले की, आमचेकडे एका लोकसेवकाविरुध्द लाचेच्या मागणी संबंधी तक्रार आली असून, सदर तक्रारीची लाचेच्या मागणीबाबत पडताळणी करावयाची आहे. पडताळणी दरम्यान गैरअर्जदारकडून लाचेची मागणी झाल्यास त्याअनुरुप लोकसेवकाविरुध्द सापळण्याचे आयोजन करुन पुढील कार्यवाही करावयाची आहे. तरी होणा-या कार्यवाहीत आपली पंच म्हणुन काम करण्याची तयारी आहे का? असे विचारल्यावर दोन्ही पंचानी पडताळणी व

सापळा कार्यवाहीत पंच म्हणुन काम करण्याची संमती दर्शविली. त्याबाबतचे संमतीपत्र दोन्ही पंचाकडून लिहून घेण्यात आले. त्यानंतर श्री. सुरज भाऊराव तोरणकर यांना पंच क्र. 1 तर श्री. स्वप्निल रामराव डुकरे यांना पंच क्र. 2 म्हणुन नेमण्यात आले.
त्यानंतर आम्ही दोन्ही पंचाना तक्रारदार श्री. अरविंद निकोसे यांनी लिहुन दिलेली तक्रार दाखविली असता ती, खालीलप्रमाणे,
मी समक्ष लाचलूचपत प्रतिबंधक विभाग झिरो माईल कार्यालय, नागपूर येथे हजर राहुन तक्रार नोंदवितो की, मी वर नमुद ठिकाणी राहत असून शासनाच्या विविध विभागामध्ये मान्यताप्राप्त कंत्राटदार म्हणुन मागील 30 वर्षापासून काम करतो.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेषिक विभाग, नागपूर यांचे तर्फे मुख्य अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेषिक विभाग, नागपूर यांचेकडुन दि. 24/05/2022 रोजी आम्हास 300 लक्ष रुपयांपर्यंतचे काम करण्याच्या पात्रतेस अनुसरुन कंत्राटदार नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झाले होते. सदर नोंदणी प्रमाणपत्र हे 3 वर्षाकरिता पात्र असून मागील 3 वर्षात जिल्हा परिषद अंतर्गत विविध कामे केलेली आहेत. नमुद प्रमाणपत्राची मुदत दि. 22/05/2025 रोजी समाप्त झालेली आहे. त्यामुळे नमुद प्रमाणत्राचे दर 3 वर्षानी नुतनीकरण करणे आवश्यक असल्याने मी दि. 18/02/2026 रोजी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे अधिकृत वेबसाईट वरुन ऑनलाईन पध्दतीने नोंदणी प्रमाणपत्रात आवश्यक असणारे कागदपत्रे अपलोड करुन रु. 3658 इतकी फॉर्म शुल्क भरुन फॉर्म सादर केले. त्यानंतर रु. 12500 एवढे नोंदणी शुल्क भरले. नोंदणी शुल्क भरल्यानंतर नमुद कागदपत्राच्या प्रती महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेषिक विभाग, नागपूर कार्यालयात सादर केले.
ऑनलाईन नोंदणी केल्यानंतर माझे कंत्राटदार नोंदणी प्रमाणपत्राचे काम कधी पुर्ण होईल याकरिता मी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नागपूर येथील लिपीक श्री नेवारे यांचे मोबाईल क्र. 9823051930 यावर माझे मोबाईल क्र. 9422141999 ने वारंवार कॉल करुन विचारणा केली असता श्री नेवारे यांनी सांगीतले कि, आपल्याला मुख्य अभियंता साहेबांना भेटावे लागेल, त्याषिवाय तुमचे काम होणार नाही. श्री नेवारे यांनी सांगीतल्याप्रमाणे दि. 07/04/2026 रोजी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नागपूर कार्यालयात जावून माझे नोंदणी प्रमाणपत्राचे कामकाजासंबंधाने श्री नेवारे लिपीक महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नागपूर यांची भेट घेतली असता श्री नेवारे यांनी सांगीतले की, तुमचे कंत्राटदार नोंदणी प्रमाणपत्राचे नुतनीकरणाचे काम पुर्ण करण्याकरिता मुख्य अभियंता साहेबांकरिता रु. 30,000 लागतील असे सांगीतले. मुख्य अभियंता साहेब हे मिटींगमध्ये व्यस्त असल्याने मला त्यांची भेट घेणे षक्य झाले नाही. श्री नेवारे यांचे सांगणेवरुन माझी खात्री झाली आहे की, श्री भुजबळ मुख्य अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नागपूर यांना भेटुन पैसे दिल्याशिवाय माझे प्रलंबित काम पुर्ण होणार नाही.

तरी मी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नागपूर येथे प्रलंबित असलेले कंत्राटदार नोंदणी प्रमाणपत्र नुतनीकरणाचे काम करण्याकरिता गैरअर्जदार श्री नेवारे, लिपीक महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नागपूर यांनी गैरअर्जदार श्री भुजबळ मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नागपूर यांचेकरिता रु. 30,000/- लाचेची मागणी केली. माझी लाच देण्याची मुळीच ईच्छा नाही. तसेच त्यांच्याशी माझे कुठलेही वैमनस्य नाही व कुठल्याही प्रकारचे आर्थीक देवाण घेवाणीचे संबंध नाही. तरी त्यांचे विरूध्द मी कायदेशिर कार्यवाही करिता तक्रार देत आहे.

सोबत मी गैरअर्जदार यांनी मागणी केलेली लाच रक्कम 30,000/- रुपये पुढील कार्यवाहीकरीता माझे बचतीतुन आपणाकडे हजर करीत आहे. तसेच मी ऑनलाईन केलेला अर्ज व कागदपत्रांच्या झेराक्स प्रती हजर करीत आहे.

सापळा पार्टीतील सदस्य पो.उप.अधी. अनिल जिट्टावार, पो.हवा. आशिष वैद्य, पो.शी. प्रफुल भातुलकर, होमेश्वर वाईलकर, म.पो.हवा. बबिता कोकर्डे चापोशी. राजेंद्र जांभुळकर यांचा नमुद दोन्ही पंचांशी व तक्रारदाराशी परिचय करून देवून यांचीच एका लोकसेवकाविरूध्द लाच मागणीसंबंधी तक्रार असल्याचे पंचांना सांगीतले.

त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना गै.अ. यांना लाचेमध्ये देण्याकरीता रू. 30,000/- हजर करण्यास सांगितले. त्यावरून त्यांनी स्वतःच्या बचतीतुन त्यांच्याकडे जमा असलेल्या रू. 500/- दराचे 60 चलनी नोटा असे एकुण रू. 30,000/- हजर केले. त्या नोटांचे क्रमांक पंच क्र. 1 यांनी वाचले व पंच क्र. 2 यांनी पडताळुन पाहिले. त्या चलनी

नोटांची प्रात्यक्षिक पंचनामा क्र. 1 मध्ये वेगळी विस्तृत यादीची नोंद घेण्यात आली आहे.

तक्रारदार व दोन्ही पंचाना लाचेच्या सापळा कार्यवाही करीता उपयोगात येणा-या अँथ्रॉसीन पावडर, अल्ट्राव्हायलेट लॅम्पचा उपयोग व त्यांचे वैशिष्टे तसेच व्हाईस रेकार्डर बाबत समजावून सांगुण प्रात्याक्षीक करुन दाखविले. त्यानंतर आमचे सुचनेवरून तक्रारदाराने लाच म्हणून द्यावयासाठी हजर केलेल्या रू. 500/- दराचे 60 चलनी नोटांना आमचे अधिनस्त म.पो.हवा. करुणा सहारे यांचे हस्ते दोन्ही बाजुने अँ थ्रॉसीन पावडर लावुन त्या नोटा एका कागदी लिफाफ्यात टाकुन त्या लिफाफ्यावर पंच व आमचे सहीचे कागदी लेबल लावुन पंचासमक्ष सिलबंद करुन तो लिफाफा ट्रॅप बॅगमध्ये सुरक्षित ठेवुन दिला. तक्रारदारास गैरअर्जदार हे आपणास केव्हा व कुठे भेटतील असे विचारले असता तक्रारदार यांनी गैरअर्जदार हे आपल्याला त्यांचे कार्यालय महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नागपूर येथे भेटतील परंतु गैरअर्जदार श्री. भुजबळ, मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नागपूर हे सद्या मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांचे कार्यालयामध्ये आढावा बैठकीकरीता गेले असल्याचे सांगीतल्याने नमुद गैरअर्जदार हे कार्यालयामध्ये हजर येताच सापळा पडताळणी व सापळा कार्यवाही आम्ही, दोन्ही पंच व स्टाफ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय झिरो माईल नागपूर येथे 18/30 वा. पावेतो हजर थांबुन राहीलो. परंतु नमुद गैरअर्जदार हे कार्यालयात हजर आले नसल्याबाबत तक्रारदार यांनी माहिती दिल्याने पुढील सापळा पडताळणी व सापळा कार्यवाही दि. 10/04/2026 रोजी करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले याबाबत प्रात्यक्षिक पंचनामा क्रमांक 1 मध्ये सविस्तर नोंदी घेण्यात आलेल्या आहेत.

दि. 10/04/2026 रोजी ठरल्याप्रमाणे आम्ही, शासकिय पंच, स्टाफ व तक्रारदार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कार्यालय झिरो माईल नागपूर येथे हजर आले परंतु गैरअर्जदार श्री. भुजबळ मुख्य अभियंता, महाराश्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नागपूर हे शासकिय कामानिमीत्त कळमेश्वर येथे गेलेले असल्याबाबत तक्रारदार यांनी माहिती दिली आलोसे श्री. भुजबळ हे कार्यालयात आल्यानंतर पुढील कार्यवाही करण्याबाबत सर्वानुमते ठरविण्यात आले. आम्ही सर्व आमचे कार्यालयामध्ये 18/00 वा. पावेतो हजर राहीलो परंतु आलोसे श्री. भुजबळ हे त्यांचे कार्यालयात आलेले नसल्याबाबत व ते यापुढे काही दिवस बाहेरगावी जाणार असल्याने कार्यालयात हजर राहणार नसल्याची त्यांना माहिती मिळाल्याने आलोसे श्री. भुजबळ हे कार्यालयात आल्याची माहिती मिळताच पुढील कार्यवाही करण्याबाबत तक्रारदार यांनी पंचासमक्ष विनंती केल्याने सदरची कार्यवाही काही काळापुरती थांबवुन तक्रारदाराने विनंती केल्याप्रमाणे पुढील कार्यवाही करण्याबाबत पंच व स्टाफ यांना सुचना देण्यात आल्या बाबत सविस्तर नोंदी सापळा पडताळणी पंचनामा क्र. 2 मध्ये घेण्यात आलेल्या आहेत.

दि. 20/04/2026 रोजी तक्रारदाराने आलोसे श्री. भुजबळ हे त्यांचे कार्यालयात हजर असल्याचे माहितीवरुन सापळा पडताळणी व सापळा कार्यवाहीचे आयोजन करण्यात आले. आम्ही, पंच व स्टाफ असे हनुमान मंदिर आवारासमोर सी.पी. क्लब जवळ सिव्हिल लाईन नागपूर येथे पाहोचुन तक्रारदार यांची अंगझडती घेण्यात आली. तक्रारदार व पंचांना सापळा पडताळणी संबंधी सुचना देण्यात आल्या व पो.षि. प्रफुल भातुलकर यांचे हस्ते पंचांसमक्ष व्हॉईसरेकॉर्डरमध्ये नविन SanDisk 32 GB Micro SDHC card serial no 5172XV30143Z BM टाकुन व्हॉईसरेकॉर्डर पंचाच्या आवाजामध्ये वेळ 13.39 वा सुरु करुन तक्रारदाराच्या गळ्यामध्ये शर्टचे आत दोरीने लटकवुन देवुन पंच क्र. 1 व तक्रारदार यांना आलोसे श्री. नेवारे व श्री. भुजबळ यांची पडताळणी करीता रवाना करण्यात आले. पंच क्र. 1 व तक्रारदार परत आल्यानंतर वेळ 14.03 वाजता आमचे सुचनेवरुन पो.शी. प्रफुल भातुलकर यांनी रेकॉर्डर बंद केला तक्रारदार यांची अंगझडती घेण्यात आली. पंच क्र. 1 यांना झालेला घटनाक्रम विचारला असता त्यांनी तक्रारदार यांनी आलोसे श्री. नेवारे यांना त्यांचे रजिस्ट्रेशन बाबत विचारणा केली असता आलोसे नेवारे यांनी तुमची फाईल मंजुर झालेली आहे साहेबांच्या सह्या झाल्या आहेत फक्त अप्रुव्हल होणे बाकी आहे. असे सांगीतल्याने आम्ही तक्रारदारासह परत आलो तक्रारदाराने सुध्दा पंच क्र. 1 यांचे कथनाला दुजोरा दिला व नोटशिटवर श्री. भुजबळ यांची सही झाल्याने मला त्यांचेशी लाचेसंबंधी बोलण्याबाबत लक्षातच आले नाही असे सांगुन परत पडताळणी करीता पाठविण्याची तक्रारदारने विनंती केली व्हाॅईसरेकाॅर्डरमधील जतन फाईल क्र. 260420_1340 ऐकुण घेतली. तक्रारदाराचे विनंतीप्रमाणे हनुमान मंदिर आवारासमोर सी.पी. क्लब जवळ सिव्हिल लाईन नागपूर येथुन परत तक्रारदार यांची अंगझडती घेवुन पंचासमक्ष व्हाईसरेकाॅर्डरमध्ये 260420_1340 या फाईल व्यतीरीक्त इतर कोणतीही रेकाॅर्डीग नसल्याची खात्री करुन देवुन आमचे सुचनेवरुन पो.शी. प्रफुल यांनी वेळ 16.17 वाजता रेकाॅर्डर पंचाच्या आवाजामध्ये सुरु करुन तक्रारदाराच्या गळ्यामध्ये शर्टचे आत दोरीने लटकवुन देवुन पंच क्र. 1 व तक्रारदार यांना आलोसे श्री. नेवारे व श्री. भुजबळ यांची पडताळणी करीता रवाना करण्यात आले. पंच क्र. 1 व तक्रारदार परत आल्यानंतर वेळ 17.24 वाजता आमचे सुचनेवरुन पो.शी. प्रफुल भातुलकर यांनी रेकाॅर्डर बंद केला तक्रारदार यांची अंगझडती

घेण्यात आली. पंच क्र. 1 यांना झालेला घटनाक्रम विचारला असता त्यांनी सांगीतले की, आलोसे श्री. नेवारे यांना लाचेसंबंधी विचारणा केली असता त्यांनी आलोसे श्री. भुजबळ यांना भेटण्याबाबत कळविले. त्यानंतर तक्रारदार श्री. भुजबळ यांना भेटले असता संभाशणा दरम्यान श्री. भुजबळ यांनी तक्रारदारास लाच स्वईच्छेने देण्याबाबत सांगीतले. तक्रारदाराने पंच क्र. 1 यांचे कथनास दुजोरा देवुन दुजोरा देवुन श्री. भुजबळ यांची लाच घेण्याची इच्छा आहे म्हणुन त्यांनी आमचे संभाषणा दरम्यान लाच स्वईच्छेने देण्याबाबत म्हटले आहे करीता दि. 21/04/2026 ला सापळा कार्यवाहीचे आयोजन करण्याबाबत पंचांसमक्ष विनंती केली. आम्ही व्हा◌ॅईस रेका◌ॅर्डर संगणकाला जोडुन फाईल क्र. 260420_1617 आमचे कार्यालयामध्ये ऐकली व सविस्तर नोंदी सापळा पडताळणी पंचनामा क्र. 3 मध्ये घेण्यात आलेल्या आहेत.

दि. 21/04/2026 रोजी ठरल्याप्रमाणे हनुमान मंदिर आवार सि.पी. क्लबजवळ सिव्हल लाईन नागपूर येथुन सापळा कार्यवाहीचे आयोजन करण्यात आले. तक्रारदाराची अंगझडती घेण्यात आली. तक्रारदार व पंचांना योग्य सुचना तसेच तक्रारदारास नियोजित इशारा बाबत माहिती दिली. पंच क्र. 2 यांचे हस्ते लाचरक्कम तक्रारदार यांचे खिशात ठेवुन पंच क्र. 2 यांनी हात स्वच्छ धुवुन घेतले. गै.अ. श्री. भुजबळ मुख्य अभियंता,म जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नागपूर यांचेवर सापळा कार्यवाही करणे असल्याने आमचे सुचनेवरुन पो.शी. भातुलकर यांनी व्हा◌ॅईस रेका◌ॅर्डरमध्ये पंचासमक्ष SanDisk 32 GB Micro SDHC card serial no 5172XV3013Z3 BM असलेला एक नविन मेमरी कार्ड टाकला वेळ 12.58 वा सुरु करुन तक्रारदाराच्या गळ्यामध्ये शर्टचे आत दोरीने लटकवुन देवुन पंच क्र. 1 व तक्रारदार यांना आलोसे यांचे कार्यालयात जाण्याकरीता रवाना करण्यात आले व आम्ही सुध्दा तक्रारदार व पंच क्र. 1 यांचे मागोमाग जावुन कोणालाही संषय येणार नाही असे आलोसे यांचे कार्यालयाचे आजुबाजुलाच थांबुन राहीलो. काही वेळाने तक्रारदार व पंच क्र. 1 असे कार्यालयाबाहेर येवुन नियोजित इशारा न करताच परत निघाले आम्ही सुध्दा त्यांचे मागोमाग येवुन हनुमान मंदिर आवार, सि.पी. क्लबजवळ सिव्हील लाईन नागपूर येथे आमचे सुचनेवरुन पो.शी. प्रफुल भातुलकर यांनी व्हा◌ॅईस रेका◌ॅर्डर वेळ 14/13 वाजता पंच क्र. 1 यांचा आवाजात बंद केला. पंच क्र. 1 यांना घडलेल्या घटनाक्रमाबाबत विचारले असता त्यांनी ते आलोसे श्री. भुजबळ यांचे कार्यालयात जावुन तक्रारदार यांनी आलोसे यांचे भेटीकरीता एक चिठ्ठी लिहुन शिपायाचे हस्ते पाठविली परंतु आलोसे यांची मिटींग सुरु असल्याने त्यांना स्वागत कक्षातच बसावे लागले ऑफीसचा लंच टाईम झाल्यानंतर आलोसे श्री. भुजबळ हे बाहेर येत असताना तक्रारदारास भेटले तेव्हा त्यांनी जेवण करुन येतो असे म्हणुन निघुन गेले. असे सांगीतले तक्रारदार यांनी पंच क्र. 1 यांनी केलेल्या कथनाला दुजोरा दिला व सापळा कार्यवाहीकरीता पुन्हा कार्यालयाचे मध्यान्नानंतर पाठविणेबाबत विनंती केली. पंच क्र. 2 यांचे हस्ते तक्रारदाराकडुन लाचरक्कम प्राप्त करुन एक लिफाफ्यात सुरक्षित ठेवण्यात आले. तक्रारदाराचे विनंतीवरुन पुढील कार्यवाही करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. ठरविल्यानुसार पुन्हा हनुमान मंदिर आवार सि.पी. क्लबजवळ सिव्हल लाईन नागपूर येथुन परत तक्रारदाराची अंगझडती घेण्यात आली. तक्रारदार व पंचांना योग्य सुचना तसेच तक्रारदारास नियोजित इशारा बाबत माहिती दिली. पंच क्र. 2 यांचे हस्ते लाचरक्कम तक्रारदार यांचे खिशात ठेवुन पंच क्र. 2 यांनी हात स्वच्छ धुवुन घेतले. गै.अ. श्री. भुजबळ मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नागपूर यांचेवर सापळा कार्यवाही करीता आमचे सुचनेवरुन पो.शी . भातुलकर यांनी पंचांना व्हा◌ॅईस रेका◌ॅर्डरमध्ये 260421_1258 या फाईलव्यतीरीक्त इतर रेका◌ॅर्डींग नसल्याची खात्री करुन देवुन वेळ 15.24 वा सुरु करुन तक्रारदाराच्या गळ्यामध्ये शर्टचे आत दोरीने लटकवुनं देवुन पंच क्र. 1 व तक्रारदार यांना आलोसे यांचे कार्यालयात जाण्याकरीता रवाना करण्यात आले व आम्ही सुध्दा तक्रारदार व पंच क्र. 1 यांचे मागोमाग जावुन कोणालाही संशय येणार नाही असे आलोसे यांचे कार्यालयाचे आजुबाजुलाच थांबुन राहीलो. काही वेळाने तक्रारदार व पंच क्र. 1 असे कार्यालयाबाहेर येवुन नियोजित इशारा न करताच परत निघाले आम्ही सुध्दा त्यांचे मागोमाग येवुन हनुमान मंदिर आवार, सि.पी. क्लबजवळ सिव्हील लाईन नागपूर येथे आमचे सुचनेवरुन पो.शी. प्रफुल भातुलकर यांनी व्हा◌ॅईस रेका◌ॅर्डर वेळ 18/47 वाजता पंच क्र. 1 यांचा आवाजात बंद केला व्हा◌ॅईस रका◌ॅर्डरमध्ये PRIVATE/SONY/REC_FILE/FOLDER-1 मध्ये फाईल 260421_1258 व फाईल 260421_1424मध्ये रेका◌ॅर्ड झाल्याचे दिसुन आले. पंच क्र. 1 यांना सापळा कार्यवाही दरम्यानचा घटनाक्रम विचारला असता त्यांनी तक्रारदार यांनी लाचेबाबत विचारले असता आलोसे श्री. भुजबळ यांनी पाकिटात टाकुण द्या, त्यांनाच द्या म्हणजेच गै.अ. श्री. नेवारे कडे द्या असे बोलले. त्यानंतर गै.अ. श्री. भुजबळ हे कार्यालयाबाहेर निघाल्याने आम्ही सुध्दा बाहेर निघुन परत आलो असे सांगीतले. तक्रारदार यांनी सुध्दा पंच क्र. 1 यांनी केलेल्या कथनाला दुजोरा दिला. तसेच तक्रारदार यांनी, गै.अ. श्री. भुजबळ यांचे सांगीतलेप्रमाणे लिफापा/पाकिट नसल्याने गै.अ. भुजबळ यांनी सांगीतल्याप्रमाणे लाचरक्कम खुले नोट दिल्यास नेवारे यांना संशय येवु नये म्हणुन मी गै.अ. नेवारे कडे लाच रक्कम देणे टाळले सदरची सापळा कार्यवाही गैरअर्जदार श्री भुजबळ यांचे

म्हणणेप्रमाणे लाचरक्कम गै.अ. श्री. नेवारे यांचेकडे देण्याकरीता उद्या दि. 22/04/2026 रोजी कार्यालयीन वेळेला घेण्यात यावी अशी तक्रारदार यांनी विनंती केली तक्रारदार यांचे म्हणण्याप्रमाणे तक्रारदार व पंच क्र. 1 यांना सापळा कार्यवाही करीता दि. 22/04/2026 रोजी सापळा कार्यवाही करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. बाबतच्या सविस्तर नोंद सापळा कार्यवाही पंचनामा क्र. 4 मध्ये घेण्यात आलेल्या आहेत.

दि. 22/04/2026 रोजी ठरल्याप्रमाणे आम्ही, पंच, स्टाफ तक्रारदार हे आमचे कार्यालयात हजर आल्यानंतर सापळा कार्यवाही आमचे कार्यालय लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नागपूर येथुनच करण्याचे सर्वानुमते करण्याचे ठरविले. तक्रारदाराची अंगझडती घेण्यात आली. तक्रारदार व पंचांना योग्य सुचना तसेच तक्रारदारास नियोजित इशारा बाबत माहिती दिली. पंच क्र. 2 यांचे हस्ते लाचरक्कम तक्रारदार यांचे खिशात ठेवुन पंच क्र. 2 यांनी हात स्वच्छ धुवुन घेतले. गै.अ. श्री. भुजबळ मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नागपूर यांचेवर सापळा कार्यवाही करणे असल्याने आमचे सुचनेवरुन पो.शी. भातुलकर यांनी व्हाॅईस रेकाॅर्डरमध्ये पंचासमक्ष SanDisk 32 GB Micro SDHC card serial no 4327XV13206U BM असलेला एक नविन मेमरी कार्ड टाकुन वेळ 14.35 वा सुरु करुन तक्रारदाराच्या गळ्यामध्ये शर्टचे आत दोरीने लटकवुन देवुन पंच क्र. 1 व तक्रारदार यांना आलोसे यांचे कार्यालयात जाण्याकरीता रवाना करण्यात आले व आम्ही सुध्दा तक्रारदार व पंच क्र. 1 यांचे मागोमाग जावुन कोणालाही संषय येणार नाही असे आलोसे यांचे कार्यालयाचे आजुबाजुलाच थांबुन राहीलो. काही वेळाने तक्रारदार व पंच क्र. 1 असे कार्यालयाबाहेर येवुन नियोजित इशारा न करताच परत निघाले आम्ही सुध्दा त्यांचे मागोमाग येवुन आमचे कार्यालय लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, झिरो माईल नागपूर येथे पोहोचलो आमचे सुचनेवरुन पो.शी. प्रफुल भातुलकर यांनी व्हाॅईस रेकाॅर्डर वेळ 16/21 वाजता पंच क्र. 1 यांचे आवाजात बंद केला. तक्रारदार यांची झडती घेवुन आम्ही, पंच क्र. 1 श्री. सुरज तोरणकर यांना तक्रारदार श्री. अरविंद निकोसे व गै.अ. श्री. नेवारे यांच्यात लाच रकमेबाबत झालेल्या संभाषणाविषयी विचारले असता पंच क्र. 1 श्री. तोरणकर यांनी सांगितले की, मी तक्रारदारासोबत त्यांच्या चारचाकी वाहनाने गै.अ नेवारे यांना भेटण्यास त्यांचे कार्यालय महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नागपूर येथे गेलो तेथे पोहोचल्यावर मी व तक्रारदार असे गै. अ. श्री. नेवारे यांचे कॅबिनमध्ये गेलो त्यांचेकडे काही लोक असल्याने आम्ही तेथेच थांबुन राहीलो. त्यानंतर तक्रारदार हे गै.अ. श्री. नेवारे यांचेसोबत त्यांचे कामाबाबत बोलले व गै.अ. भुजबळ यांनी सांगीतलेली 30,000/- रुपये आपणाकडे द्यायला लावले आहे ते देवु का असे विचारले असता गै.अ. श्री. नेवारे हे नाही...नाही....नाही... असे बोलले व इतर कामाविषयी बोलुन तक्रारदार व मी बाहेर निघत असताना गै.अ. नेवारे यांनी तक्रारदारास बोलावुन वाॅशरुम जवळ घेवुन गेले मी पण त्यांचेसोबत गेलो तेव्हा गै.अ. श्री. नेवारे हे तक्रारदारास म्हणाले की, ''तुमच्या जवळ घाबरला माणुस'' त्यावर तक्रारदार म्हणाले ''कोण'' यावर गै.अ. नेवारे म्हणाले ''साहेब'' समोर म्हणाले की, म्हणून साहेबांनी मला काही म्हणलं नाही, तुम्हाले काही म्हणलं नाही, म्हणल जावू दे, तक्रारदाराने ठिक आहे म्हणत गै.अ. श्री. नेवारे यांनी लाचरक्कम न स्विकारल्याने या कार्यालयात परत आलो असे सांगीतले. तक्रारदाराने सुध्दा पंच क्र. 1 यांचे कथनाला दुजोरा दिला. त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांसमक्ष तक्रारदार यांना विचारले की, गै.अ. श्री. नेवारे यांनी आपणाकडुन लाच घेतलेली नाही यावरुन गै.अ. श्री. भुजबळ व गै.अ. नेवारे यांना सापळा कार्यवाहीबाबत संषय आलेला आहे का? यावर पंच व स्टाफसमक्ष तक्रारदार म्हणाले की, आज रोजी सापळा कार्यवाहीदरम्यान मी गै.अ. श्री. नेवारे यांना भेटलो असताना संभाषणादरम्यान गै.अ. नेवारे यांनी मला वाॅशरुमकडे बोलावुन साहेब घाबरले आहे म्हणुन मला पण काही म्हटलं नाही न तुम्हाला पण काही म्हटल नाही, जाउ द्या असे म्हणाले. तसेच संभाषणादरम्यान त्यांनी मला ऑनलाईन करुन पैसे भरुन टाका व पैसे भरुन झाल्यावर मला सांगा असे बोलले. मी वारंवार त्यांचे कार्यालयात आल्याने कदाचीत पैसे घेण्यास त्यांनी टाळाटाळ केली आहे परंतु माझे पुर्वीच्या अनुभवावरुन माझे ऑनलाईन काम होवुन पेमेंट झाल्यानंतर माझे काम पुर्ण न झाल्याने ते मला लाचमागणी करेलच अशी मला खात्री आहे. मी आता माझे ऑनलाईन सर्टिफीकेट जनरेट करण्याकरीता ऑनलाईन पेमेंट करतो व त्यानंतर गै.अ. नेवारे यांचे काॅलची वाट बघतो किंवा त्यांचे सांगणेप्रमाणे त्यांना काॅल करुन माहिती देतो यावर गै.अ. नेवारे काय म्हणतात त्यानुसार पुढील सापळा कार्यवाहीचे आयोजन करण्याबाबत तक्रारदार यांनी विनंती केली. तक्रारदार यांचे म्हणण्याप्रमाणे इतर कार्यालयीन दिवशी सापळा कार्यवाही करणेबाबत सर्वानुमते ठरविण्यात आले.

त्यानंतर दि. 06/05/2026 रोजी तक्रारदार यांनी आम्हास काॅल करुन कळविले की, त्यांचे ऑनलाईन काम पुर्ण झालेले आहे तेव्हा आज रोजी गैरअर्जदार यांचेवर सापळा कार्यवाही करणे योग्य राहील अशा तक्रारदाराच्या माहितीवरुन तक्रारदार, पंच व स्टाफ यांना आमचे नविन कार्यालय लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, प्रशासकिय इमारत क्र. 1 चौथा माळा सिव्हील लाईन नागपूर येथे बोलावुन घेतले तक्रारदाराने सांगीतलेली माहिती पंच व स्टाफ यांना देवुन

यांनी त्यांचे गैरअर्जदार यांचेकडे प्रलंबित ऑनलाईन काम पुर्ण झाले असल्याचे सांगुन आज रोजी कार्यालयीन वेळेत गैरअर्जदार श्री. नेवारे, लिपीक, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नागपूर व श्री. भुजबळ, मुख्य अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नागपूर यांचेवर सापळा कार्यवाही करणेबाबत विनंती केली. तक्रारदार यांचे विनंतीप्रमाणे तक्रारदार यांना आमचे कार्यालय लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, झिरो माईल नागपूर येथुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, प्रशासकिय इमारत क्र. 1, 4 था माळा सिव्हील लाईन नागपूर येथे स्थलांतरीत झाल्याने नविन कार्यालयात बोलाविण्यात आले तसेच उपरोक्त दोन्ही शासकिय पंचांना तक्रारदार यांनी दिलेली माहिती देवुन सापळा कार्यवाहीकरीता फोनद्वारे आमचे नविन कार्यालय येथे बोलाविण्यात आले. सापळा कार्यवाही कार्यवाही डाॅ. बाबासाहेब आंबेडकर, सामाजिक भवन, शासकिय वसाहत रवीनगर नागपूर येथुन करण्याचे सर्वानुमते ठरविले. वेळ 13/00 वाजता आम्ही पंच व स्टाफ असे डाॅ. बाबासाहेब आंबेडकर, सामाजिक भवन, शासकिय वसाहत रवीनगर नागपूर येथे जाणेकरीता सापळा कार्यवाहीच्या साहित्यासह निघालो. नमुद ठिकाणी पोहोचुन तक्रारदार यांची पंचासमक्ष सापळा पुर्व अंगझडती घेवुन त्यांचेजवळील वस्तुची यादी तयार करण्यात आली व हस्तलिखीत झडती तयार करुन त्यावर आम्ही पंच व तक्रारदार यांनी स्वाक्षरी केल्या व वस्तु वेळीच परत केल्या. तक्रारदार, पंच व स्टाफ यांना सापळा कार्यवाही बाबत सुचना व आपल्या भुमिकेबाबत माहिती दिली. आमच्या सुचनेवरुन पंच क्र. 2 यांनी लाचरक्कम तक्रारदार यांचे पॅंटचे उजवे खिशामध्ये अलगत ठेवले. त्यानंतर आमच्या सुचनेवरुन पो.षि. प्रफुल भातुलकर यांनी व्हाईस रेकाॅर्डर मध्ये SanDisk 32 GB SanDisk Micro SDHC card serial no 5172XV3018MN BM नविन मेमरी कार्ड टाकला व वेळ 13.50 वाजता पंच क्र. 1 यांचे आवाजात व्हाईस रेकाॅर्डर सुरु दोरीचे सहाय्याने तक्रारदार यांचे गळ्यामध्ये शर्टचे आत लटकवुन दिला व पंच क्र. 1 सह तक्रारदार यांना गैरअर्जदार यांचे कार्यालयात पाठविण्यात आले त्यांचे मागोमाग आम्ही पंच क्र. 2 व स्टाफसह निघालो व आजुबाजुला थांबुन राहीलो व नियोजित इशा-याची वाट बघत राहीलो काही वेळाने नियोजित इशारा न करता तक्रारदार व पंच क्र. 1 कार्यालयाबाहेर निघाले आम्ही त्यांचे मागोमाग डाॅ. बाबासाहेब आंबेडकर, सामाजिक भवन, शासकिय वसाहत रवीनगर नागपूर येथे आलो पंच क्र. 1 यांचे आवाजामध्ये व्हाॅईस रेकाॅर्डर बंद केले. पंच क्र. 2 यांचे हस्ते तक्रारदार यांचेकडुन लाचरक्कम ताब्यात घेवुन ट्रॅपबॅगमध्ये सुरक्षित ठेवण्यात आली. तक्रारदार यांची अंगझडती घेवुन त्यांचेजवळील वस्तुची यादी तयार करण्यात आली व हस्तलिखीत झडती तयार करुन त्यावर आम्ही पंच व तक्रारदार यांनी स्वाक्षरी केल्या व वस्तु वेळीच परत केल्या. यानंतर आम्ही, पंच क्र. 1 श्री. सुरज तोरणकर यांना तक्रारदार श्री. अरविंद निकोसे व गै.अ. श्री. नेवारे यांच्यात लाच रकमेबाबत झालेल्या संभाषणाविषयी विचारले असता पंच क्र. 1 श्री. तोरणकर यांनी सांगितले की, मी तक्रारदारासोबत त्यांच्या चारचाकी वाहनाने गै.अ. नेवारे यांना भेटण्यास त्यांचे कार्यालय महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नागपूर येथे गेलो तेथे पोहोचल्यावर मी व तक्रारदार असे गै.अ. श्री. नेवारे यांचे कॅबिनमध्ये गेलो त्यांचेकडे काही लोक असल्याने आम्ही तेथेच थांबुन राहीलो. त्यानंतर तक्रारदार हे गै.अ. श्री. नेवारे यांचेसोबत त्यांचे कामाबाबत व इतरत्र विषयावर बोलले त्यानंतर तकारदारांनी गै.अ. श्री. नेवारे यांना विचारले की, साहेबांना म्हणजेच गै.अ. भुजबळ यांना भेटावे लागेल का? त्यावर गै.अ. श्री. नेवारे म्हणाले कशासाठी? तक्रारदार म्हणाले, त्या दिवशी पैसे म्हणत होते ना साहेब म्हणुन तेव्हा गै.अ. श्री. नेवारे म्हणाले की तुम्ही आता नको भेटा, कोणीतरी मुन साहेब आले होते आणी धान भरुन गेले म्हणुन गडबड झाली असे म्हणाले म्हणुन आणी गै.अ. श्री. भुजबळ हे सुध्दा मिटींगला असल्याने आम्ही या ठिकाणी परत आलो व माझे आवाजात व्हाईस रेकाॅर्डर बंद करण्यात आला असे कथन केले.

त्यानंतर आम्ही तक्रारदारास घडलेल्या घटनाक्रमाविषयी विचारले असता, त्यांनी पंच क्र. 1 यांनी सांगितलेली वरील हकीकत बरोबर असल्याचे सांगुन त्यास दुजोरा दिला. त्यावर आम्ही दोन्ही पंचांसमक्ष तक्रारदार यांना विचारले की, गै.अ. श्री. नेवारे यांना गै.अ. श्री. भुजबळ यांनी लाच आपणाकडे देण्यास सांगीतले असल्याचे गै.अ. श्री. नेवारे यांना आठवण का करुन दिली नाही? अशी विचारणा केली असता तक्रारदार म्हणाले की, गै.अ. श्री. नेवारे यांना मी साहेबांना म्हणजेच गै.अ.श्री. भुजबळ यांना भेटु काय? असे विचारले असता त्यांनी भेटायची गरज नाही असे सांगत त्यांनी सुध्दा लाचेची मागणी किंवा स्विकारणी बाबत काहीही बोलले नाही म्हणुन मी वारंवार लाचेबाबत बोलणे टाळुन परत आलेलो आहे असे सांगीतले. त्यानंतर तक्रारदार यांनी गै.अ.श्री. भुजबळ यांची मिटींग संपल्यानंतर त्यांना भेटुन सापळा कार्यवाही करणेबाबत विनंती केली. तक्रारदार यांचे म्हणण्याप्रमाणे गै.अ. श्री. भुजबळ यांची मिटींग संपल्यानंतर काही वेळाने गै.अ. श्री. भुजबळ यांना भेटुन पुढील सापळा कार्यवाही करणेबाबत सर्वानुमते ठरविण्यात आलेले आहे. व्हाईस रेकाॅर्डरच्या सहाय्याने मेमोरी कार्ड मध्ये रेकाॅर्ड झालेल्या फाईलची हॅष व्हॅल्यु घेण्यात आली. तक्रारदार व गैरअर्जदार यांचे संभाषण शब्दश ऐकुण स्क्रिप्ट तयार करण्यात आलेली आहे.

दि. 06/05/2026 ला पुन्हा सापळा कार्यवाही कार्यवाही डाॅ. बाबासाहेब आंबेडकर, सामाजिक भवन,

षासकिय वसाहत रवीनगर नागपूर येथुन करण्याचे सर्वानुमते ठरविले. वेळ 17/10 वाजता आम्ही पंच व स्टाफ असे डा ॅ. बाबासाहेब आंबेडकर, सामाजिक भवन, शासकिय वसाहत रवीनगर नागपूर येथे जाणेकरीता सापळा कार्यवाहीच्या साहित्यासह हजर आलो. नमुद ठिकाणी पोहोचुन तक्रारदार यांची पंचासमक्ष सापळा पुर्व अंगझडती घेवुन त्यांचेजवळील वस्तुची यादी तयार करण्यात आली व हस्तलिखीत झडती तयार करुन त्यावर आम्ही पंच व तक्रारदार यांनी स्वाक्षरी केल्या व वस्तु वेळीच परत केल्या. तक्रारदार, पंच व स्टाफ यांना सापळा कार्यवाही बाबत सुचना व आपल्या भुमिकेबाबत माहिती दिली. आमच्या सुचनेवरुन पंच क्र. 2 यांनी लाचरक्कम तक्रारदार यांचे पॅंटचे उजवे खिषामध्ये अलगत ठेवले. त्यानंतर आमच्या सुचनेवरुन पो.शी. प्रफुल भातुलकर यांनी व्हाईस रेका ॅर्डर मधील SanDisk 32 GB SanDisk Micro SDHC card serial no 5172XV3018MN BM नविन मेमरी मध्ये फाईल क्र. 260506_1349 ऐवजी इतर कोणतीही फाईल नसल्याची पंचांना खात्री करुन देवुन वेळ 17.39 वाजता पंच क्र. 1 यांचे आवाजात व्हाईस रेका ॅर्डर सुरु दोरीचे सहाय्याने तक्रारदार यांचे गळ्यामध्ये शर्टचे आत लटकवुन दिला व पंच क्र. 1 सह तक्रारदार यांना गैरअर्जदार यांचे कार्यालयात पाठविण्यात आले त्यांचे मागोमाग आम्ही पंच क्र. 2 व स्टाफसह निघालो व आजुबाजुला थांबुन राहीलो व नियोजित इशा-याची वाट बघत राहीलो काही वेळाने नियोजित इशारा न करता तक्रारदार व पंच क्र. 1 कार्यालयाबाहेर निघाले आम्ही त्यांचे मागोमाग डा ॅ. बाबासाहेब आंबेडकर, सामाजिक भवन, शासकिय वसाहत रवीनगर नागपूर येथे आलो पंच क्र. 1 यांचे आवाजामध्ये व्हा ॅईस रेका ॅर्डर बंद केले. पंच क्र. 2 यांचे हस्ते तक्रारदार यांचेकडुन लाचरक्कम ताब्यात घेवुन ट्रॅपबॅगमध्ये सुरक्षित ठेवण्यात आली. तक्रारदार यांची अंगझडती घेवुन त्यांचेजवळील वस्तुची यादी तयार करण्यात आली व हस्तलिखीत झडती तयार करुन त्यावर आम्ही पंच व तक्रारदार यांनी स्वाक्षरी केल्या व वस्तु वेळीच परत केल्या. यानंतर पंच क्र. 1 यांना झालेल्या संभाषणाबाबत विचारणा केली असता त्यांनी सांगीतले की, मी तक्रारदारासोबत त्यांच्या चारचाकी वाहनाने गै.अ. भुजबळ यांना भेटण्यास त्यांचे कार्यालय महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नागपूर येथे गेलो तेथे पोहोचल्यावर मी व तक्रारदार असे गै.अ. श्री. भुजबळ यांचे कार्यालयात जावुन त्यांचे कॅबीनकडे गेलो कार्यालयातील शिपायाचे हस्ते तक्रारदार यांनी एक चिठ्ठी लिहुन त्यांचेकडे पाठविली. काही वेळाने तक्रारदार यांना गै.अ. श्री. भुजबळ यांनी तक्रारदारास आत बोलावुन घेतले मी सुध्दा त्यांचे मागोमाग जात असताना तेथील शिपायाने मला हाताने इशारा करुन थांबविले म्हणुन मी कॅबीनच्या दरवाज्याजवळच थांबलो व तक्रारदार कॅबिनमध्ये गेले. तेव्हा कॅबीनमध्ये कोणीतरी दोन व्यक्ती बसुन होते. तक्रारदार हे गै.अ. श्री. भुजबळ यांना म्हणाले की, थॅंक्यू सर, रजिस्ट्रेशन झालं माझं..थॅंक्यू म्हणाला आलो होतो असे म्हणाले त्यावर गै.अ. श्री. भुजबळ म्हणाले ठिक आहे. त्यानंतर तक्रारदार म्हणाले की, त्यांना म्हणजेच गै.अ. श्री. नेवारे यांना भेटलो होतो. असे म्हणाले असता गै.अ. श्री. भुजबळ म्हणाले की, ठिक आहे त्यांनाच भेटा म्हणजेच गै.अ. नेवारे यांनाच भेटा असे बोलले तक्रारदार यांनी ठिक आहे म्हणत कॅबिन बाहेर आले व आम्ही या ठिकाणी परत आलो व माझे आवाजात व्हाईस रेका ॅर्डर बंद करण्यात आला असे कथन केले.

त्यानंतर आम्ही तक्रारदारास घडलेल्या घटनाक्रमाविषयी विचारले असता, त्यांनी पंच क्र. 1 यांनी सांगितलेली वरील हकीकत बरोबर असल्याचे सांगुन त्यास दुजोरा दिला. त्यावर आम्ही दोन्ही पंचासमक्ष तक्रारदार यांना विचारले की, गै.अ.श्री. भुजबळ यांनी त्यांनाच भेटा म्हणजेच गै.अ. श्री. नेवारे यांनाच भेटा असे म्हटले आहे. तेव्हा आपण त्याचवेळी गै.अ. नेवारे यांना का भेटुन पुढील कार्यवाही का केलेली नाही? यावर तक्रारदार म्हणाले की, मी गै.अ. श्री. भुजबळ यांना त्यांना म्हणजेच नेवारे यांना भेटलो होतो असे म्हणुन विषयाची सुरुवात केली होती परंतु त्यांचे कॅबिनमध्ये कोणीतरी दोन व्यक्ती बसुन असल्याने त्यांनी त्यांनाच भेटा असे म्हणत या विषयावर बोलणे टाळले, मी यापुर्वीच गै.अ. श्री. नेवारे यांना भेटुण आल्याने वारंवार त्यांचेकडे जावुन लाचेसंबंधी बोलल्यास त्यांना सापळा कार्यवाहीबाबत संशसय येवु नये म्हणुन मी गै.अ. श्री. नेवारे यांचेकडे न जाता परत आलेलो आहे असे सांगीतले. त्यानंतर आम्ही पंचासमक्ष तक्रारदार यांना गै.अ. श्री. भुजबळ यांचे सांगणेप्रमाणे लाच घेवुन गै.अ. नेवारे यांचेकडे जावुन सापळा कार्यवाही करण्याबाबत बोललो असता तक्रारदार यांनी विनंती केली की, वारंवार गै.अ. श्री. नेवारे यांना भेटल्यास सापळा कार्यवाहीबाबत त्यांना संशय येईल. तेव्हा सापळा कार्यवाही काही दिवस थांबवुन गै.अ. श्री. नेवारे यांचा का ॅल आल्यावर किंवा त्यांचा कोणताही मॅसेज आल्यावर पुढील कार्यवाही इतर कार्यालयीन दिवशी करावी. तक्रारदार यांचे म्हणण्याप्रमाणे इतर कार्यालयीन दिवशी सापळा कार्यवाही करणेबाबत सर्वानुमते ठरविण्यात आलेले आहे. व्हाईस रेका ॅर्डरच्या सहाय्याने मेमोरी कार्ड मध्ये रेका ॅर्ड झालेल्या फाईलची हॅष व्हॅल्यु घेण्यात आली. तक्रारदार व गैरअर्जदार यांचे संभाशण शब्दश ऐकुण स्क्रिप्ट तयार करण्यात आलेली आहे सविस्तर नोंदी सापळा कार्यवाही पंचनामा क्र. 6 मध्ये नोंदी घेण्यात आलेल्या आहेत.

आम्ही दि. 10/06/2026 रोजी वेळ 12/30 वाजता चे सुमारास तक्रारदार श्री. अरविंद निकोसे हे आमचे कार्यालयात हजर आले व कळविले की, त्यांची मध्यंतरी कालावधीत घरीच पायरीवर पाय घसरल्याने माझे

डोक्याला व पायाला मार लागल्याने मी आपणाशी संपर्क केला नाही किंवा या सापळा कार्यवाहीबाबत कोणाशीही काहीही बोललो नाही. माझे माहिती नुसार आज रोजी गैरअर्जदार श्री. भुजबळ, मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेषिक विभाग, नागपूर हे त्यांचे कार्यालयातच हजर आहेत. तेव्हा गैरअर्जदार यांचेवर सापळा कार्यवाही करणेबाबत विनंती केली. आम्ही तात्काळ शासकिय पंच मिळणेकरीता मा. राज्यकर सहआयुक्त (ऑं डीट), जी.एस.टी. कार्यालय, सिव्हिल लाईन्स, नागपूर यांना पत्र देऊन वर्ग- 2 चे दोन शासकीय अधिकारी/कर्मचारी पंच म्हणुन काम करण्यास उपलब्ध करुन देण्याबाबत विनंती पत्र देवुन पो.शी. वाईलकर यांना रवाना करण्यात आले. दोन पंच म्हणुन अधिकारी कर्मचारी उपलब्ध करुन दिले ज्यामध्ये क्र. 2 पंच श्री. डुकरे हे इतर शासकीय कामामध्ये व्यस्त असल्याने त्यांचे जागेवर पंच क्र. 2 म्हणुन श्री. सारंगपुरे यांना उपलब्ध करुन दिल्याने नमुद दोन्ही पंचांना नियमाप्रमाणे नव्याने प्रात्यक्षिक करुन दाखविले व इतर पंचनामा कार्यवाहीबाबत माहिती देण्यात आली. दोन्ही पंचांचे संमतीपत्र घेण्यात आले. तक्रारदार यांचे विनंतीप्रमाणे सापळा कार्यवाही सि.पी. क्लब जवळ, हनुमान मंदिर आवार सिव्हील लाईन नागपूर येथुन करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. आम्ही पंच व स्टाफ असे वेळ 15/20 वाजता नमुद ठिकाणी सापळा कार्यवाहीच्या साहित्यासह हजर आलो. नमुद ठिकाणी पोहोचुन तक्रारदार यांची पंचासमक्ष सापळा पुर्व अंगझडती घेवुन त्यांचेजवळील वस्तुची यादी तयार करण्यात आली व हस्तलिखीत झडती तयार करुन त्यावर आम्ही पंच व तक्रारदार यांनी स्वाक्षरी केल्या व वस्तु वेळीच परत केल्या. तक्रारदार, पंच व स्टाफ यांना सापळा कार्यवाही बाबत सुचना व आपल्या भुमिकेबाबत माहिती दिली. आमच्या सुचनेवरुन पंच क्र. 2 यांनी लाचरक्कम तक्रारदार यांचे पॅंटचे उजवे खिषामध्ये अलगत ठेवले. त्यानंतर आम्ही व्हाईस रेकाॅर्डर मधीलSanDisk 32 GB SanDisk Micro SDHC Card Serial No 5334XV64139V BM नविन मेमरी कार्ड टाकुन वेळ 16.16 वाजता पंच क्र. 1 यांचे आवाजात व्हाईस रेकाॅर्डर सुरु दोरीचे सहाय्याने तक्रारदार यांचे गळ्यामध्ये शर्टचे आत लटकवुन दिला व पंच क्र. 1 सह तक्रारदार यांना गैरअर्जदार यांचे कार्यालयात पाठविण्यात आले त्यांचे मागोमाग आम्ही पंच क्र. 2 व स्टाफसह निघालो व आजुबाजुला थांबुन राहीलो व नियोजित इशा-याची वाट बघत राहीलो काही वेळाने आम्ही सांगीतल्याप्रमाणे तक्रारदार यांनी आमच्या व्हाॅट्सअँपवर क्वदम असा मॅसेज दिला. नियोजित इशारा मिळताच आम्ही पंच क्र. 2 व स्टाफसह गैरअर्जदार श्री. भुजबळ यांचे कक्षामध्ये गेलो. कॅबिनमधुन एक ईसम बाहेर येताना दिसले त्यांना आम्ही आमचा परिचय करुन देवुन आमचा येथे येण्याचा उद्देश समजावुन सांगुन त्यांना त्यांचे नाव विचारले असता त्यानी आपले नाव अरविंद अजाबराव रिठे असे सांगुन येथे शिपाई या पदावर काम करतो असे सांगीतले. त्यांना भुजबळ साहेबांबाबत विचारणा केली असता त्यांनी साहेब वाॅषरुमला गेले आहे असे सांगीतले. त्यांना येथे साहेबांना कोणी भेटायला आले होते काय? याबाबत विचारणा केली असता, होय, कोणीतरी निकोसे नावाचे व्यक्ती येथे आले होते ते साहेबांना भेटले व चर्चा केली व बाहेर गेले त्यानंतर भुजबळ साहेबांनी मला पाणी मागीतले मी पाणी घेवुन गेलो, साहेबांनी पाणी घेतले व लगेच कॅबिनला अटॅच वाॅशरुमकडे गेले व त्यानंतर मी सुध्दा कॅबीन बाहेर येत असताना आपण मला दिसलेत.

आम्ही समोर जावुन बघीतले असता गैरअर्जदार यांचे कक्षालाच एक अटॅच वाॅशरुम होते जवळ जावुन दाराची पाहणी केली असता ते आतमधुन लावल्याचे समजुन आले. थोडा वेळ थांबुन राहील्यानंतर एक व्यक्ती बाहेर आलेत त्यांना पाहुन पंच क्र. 1 यांनी हेच गैरअर्जदार श्री. भुजबळ साहेब असल्याचे सांगीतले. गैरअर्जदार यांना आम्ही आमचा, सर्व पंच व स्टाफ यांचा परिचय करुन देवुन आमचा येण्याचा उद्देष समजावुन सांगुन पुढील कार्यवाहीकरीता सहकार्य करण्याबाबत सांगीतले. गैरअर्जदार यांना स्वतःबाबत माहिती विचारली असता त्यांनी त्यांचे नाव सुभाश बबन भुजबळ वय 50 वर्ष पद- मुख्य अभियंता, महाराष्ट्र जिवन प्राधिकरण नागपूर रा. नारायणगाव ता. जुन्नर जि. पुणे ह.मु. जिवनधारा गेस्ट हाऊस, सुट क्र. 02 फुटाळा तलावाजवळ विभाग महाराष्ट्र जिवन प्राधिकरण नागपूर असे सांगीतले.

त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना लाच रक्कम कोणी स्विकारली आणि कुठे ठेवली याबाबत विचारले असता, त्यांनी सांगितले की, गैरअर्जदार श्री. सुभाष भुजबळ यांनी मला लाच रक्कम त्यांचे टेबलचे उजव्या बाजुच्या वरील ड्राव्हरमध्ये ठेवण्यास सांगीतले गैरअर्जदार यांनी सांगीतलेप्रमाणे "मी लाच रक्कम आपले पॅंटचे उजवे खिशातुन काढुन उजवे हातानी ती लाच रक्कम गैरअर्जदार यांचे टेबलचे उजव्या बाजुच्या वरील ड्राव्हरमध्ये ठेवले आहेे. त्यामुळे आम्ही व दोन्ही पंचांना घेवुन गैरअर्जदार श्री. सुभाश भुजबळ समोरील उजवे बाजुच्या वरील ड्राव्हर मध्ये ठेवुन दिसली. त्यानंतर आम्ही सापळा रक्कम गैरअर्जदार यांचे ताब्यातुन पंच क्र. 2 यांचे हस्ते ताब्यात घेण्याचे पुर्वी आमचे दोन्ही पंच व सापळा पथकातील हजर असलेले सर्व सदस्यांचे कॅबीनमध्ये अंधार करून अल्ट्राव्हाईलेट लॅम्पचे प्रकाशात तपासले असता कोणाचेही हातावर हिरवटसर रंगाची चकाकी दिसुन आली नसल्याची गैरअर्जदार यांना खात्री करून दिली. त्यानंतर सदरची लाच रक्कम पंच क्र 2 यांना गैरअर्जदार श्री. सुभाष भुजबळ बसत असलेल्या त्यांचे बसण्याचे ठिकाणाचे उजवे बाजुस असलेल्या वरच्या ड्राव्हरमधुन ताब्यात घेण्याची सुचना दिली

असता पंच क्र. 2 यांनी लाच रक्कम आमचे सुचनेप्रमाणे ताब्यात घेतली. त्यानंतर तक्रारदार यांचेकडील व्हाॅईसरेकाॅर्डर पंच क्र. 1 यांचे आवाजात 17/13 वा. बंद केला. तक्रारदार श्री. निकोसे व गैरअर्जदार श्री. भुजबळ यांची पंचासमक्ष अंगझडती घेण्यात आली. तसेच गैरअर्जदार यांचे कॅबिनची झडती घेतली. तक्रारदार श्री. निकोसे व गैरअर्जदार श्री. भुजबळ यांचेमध्ये झालेल्या संभाशण ऐकुण घेवुन स्क्रिप्ट तयार करण्यात आली. नमुद फाईलची हॅश व्हॅल्यु घेण्यात आली. श्री. नेवारे यांचेकडुन तक्रारदार श्री. अरविंद निकोसे यांचे कामासंबंधीचे कागदपत्रे जप्त करण्यात आले. गैरअर्जदार श्री. सुभाश भुजबळ यांचे अँपल कंपनीचे मोबाईल ताब्यात घेण्यात आले असुन सविस्तर जप्तीपत्रकाप्रमाणे जप्त करण्यात आले आहे. घटनास्थळाचा हातनकाशा तयार करण्यात आला आहे. तक्रारदार व गैरअर्जदार यांचे सापळा कार्यवाही दरम्यानचे संभाषण असलेले मेमोरीकार्ड जप्तीपत्रकाप्रमाणे जप्त करण्यात आले आहे.

पंच क्र 2 यांनी गैरअर्जदार सुभाष भुजबळ यांनी तक्रारदार यांचे कडुन स्विकारलेली लाच रक्कम 30,000 रू ज्यात 500 रू दराचे चलनी 60 नोटा गैरअर्जदार यांचे कार्यालयातच नोटाचे क्रमांक आमचे सुचनेवरून पंच क्र. 1 श्री. सुरज तोरणकर यांनी वाचले व पंच क्र. 2 धनेश्वर सारंगपुरे यांनी प्रात्यक्षीक पंचनामा मधील नमुद नोटाच्या क्रमांकाशी जुळवुन पाहुन तेच नोट असल्याची खात्री केली लाचरक्कम पुरावेकामी जप्तीपत्रकाप्रमाणे जप्त करण्यात आली आहे.

यानंतर आम्ही, तक्रारदार श्री. अरविंद निकोसे यांच्यात सापळा कार्यवाही दरम्यान झालेल्या संभाषणाविषयी विचारले असता तक्रारदार यांनी सांगितले की, मी पंच क्र. 1 यांचेसोबत माझे चारचाकी वाहनाने गै.अ.श्री. सुभाश भुजबळ यांचे कार्यालयामध्ये सापळा कार्यवाही करीता गेलो तेथे पोहाचेल्यावर मी व पंच क्र. 1 असे गै.अ. श्री. सुभाष भुजबळ यांचे कॅबिनजवळ जावुन एका षिपायाचे हाताने गै.अ. श्री. सुभाष भुजबळ यांना भेटण्याकरीता चिठ्ठी दिली व पंच क्र. 1 सह मी तेथील प्रतिक्षालयात थांबुन राहीलो गै.अ. श्री. भुजबळ यांचे कक्षामध्ये कोणीतरी पी.ए. बसुन असल्याचे तेथील शिपायाने मला सांगीतले. कोणीतरी इसम त्यांचे कक्षामध्ये असताना ते लाचेसंबंधी बोलणार नाही असे मला वाटत असल्याने मला साहेबासोबत एकट्यात भेटायच होत असे त्या शिपायाला म्हणालो. त्यानंतर काही वेळानंतर गैरअर्जदार यांच्या कॅबिनमध्ये गेलो आतमध्ये शिपाई ये जा करीत होता व कॅबिनमध्ये फक्त गै.अ. श्री. भुजबळ हेच होते. मी साहेबांना नमस्कार घेतला त्यानंतर त्यांना मी नविन जलजिवनचा रिव्हाईस प्रस्ताव आणणार आहो असे सांगीतले व उद्या घेवुन येणार होतो, आज आलोच होतो तर तुम्हाला भेटुन घ्याव असे म्हणालो त्यावर ते हं. असे म्हणाले त्यानंतर मी माझे कामाबाबत बोलणी केली की, मागे ही रजिस्ट्रेशन वैगेरे मी केल होत त्याच राहुन गेल, ते देवुन टाकाव तुम्हाले असे म्हणालो त्यावर गै.अ. श्री. भुजबळ हे म्हणाले की, त्यांचेकडेच देवुन टाका, मी म्हणालो,'' मागे तुम्ही म्हटल तर त्याच्याजवळ गेलो होतो त ते म्हणे साहेबाकडेच दया म्हणे मग मी चाललो गेलो, मी म्हणल उदया पुन्हा घेवुन येणार आहो तत्पुर्वी भेटुन घ्याव म्हणल तुम्हाले, म्हणुन आलो'' तर ते देवुन देवु का? अशी विचारणा केली असता गै.अ. श्री. भुजबळ यांनी त्यांचे टेबलचे ड्राव्हरकडे इशारा करीत ठेवुन द्या तीथ तुमच हे असे म्हणाले, म्हणुन मी लाच रक्कम आपले पॅंटचे उजवे खिशातुन काढुन उजवे हातानी ती लाच रक्कम गैरअर्जदार यांचे टेबलचे उजव्या बाजुच्या वरील ड्राव्हरमध्ये ठेवले असे व इतर संभाषण करुन मी गै.अ. श्री. भुजबळ यांना थँक्यु, थँक्यु म्हणुन कक्षाबाहेर आलो व आपणाला आपले व्हाॅट्सअँप नंबरवर Done असा मॅसेज दिला. आपण पंच क्र. 2 व स्टाफसह लगेच कक्षामध्ये येवुन पुढील कार्यवाही केलेली आहे व माझेकडील व्हाॅइस रेकाॅर्डर पंच क्र. 1 यांचे आवाजात बंद केला आहे असे कथन केले.

त्यानंतर आम्ही पंच क्र. 1 यांना घडलेल्या घटनाक्रमाविषयी विचारले असता, त्यांनी मी व पंच तक्रारदार असे गैरअर्जदाराचे लाच मागणीप्रमाणे लाच रक्कम देण्याकरीता तक्रारदार यांचेसोबत त्यांचे चारचाकी वाहनाने गैरअर्जदार यांचे कार्यालयात गेलो होतो. कार्यालयामध्ये गेल्यानंतर गैरअर्जदार यांचे कक्षामध्ये जाण्याची परवानगी करीता तेथील शिपाई यांचे हस्ते एक चिठ्ठी मध्ये आपले नाव लिहुन तक्रारदार यांनी पाठविली काही वेळानंतर तक्रारदार यांना आत बोलाविण्यात आले. त्यांचेसोबत मी सुध्दा जाणेकरीता निघालो असता तेथील षिपाई यांनी मला थांबण्यास सांगीतले म्हणुन मी गैरअर्जदार यांचे कक्षाचे बाहेरच थांबुन राहीलो. काही वेळानंतर तक्रारदार श्री. निकोसे हे गैरअर्जदार यांचे कॅबिनचे बाहेर आले व गैरअर्जदार यांनी लाच स्विकारली असल्याबाबत हाताने मला इशारा केला व आपणास व्हाॅट्सअॅप मॅसेज दिला त्यानंतर आपण येवुन पुढील कार्यवाही केली व माझे आवाजामध्ये व्हाॅईस रेकाॅर्डर बंद केला. सविस्तर नोंदी सापळा कार्यवाही पंचनामा क्र. 7 मध्ये नोंद घेण्यात आलेली आहे.

गैरअर्जदार श्री. सुभाष बबन भुजबळ वय 50 वर्ष पद- मुख्य अभियंता, महाराष्ट जीवन प्राधिकरण, नागपूर यांनी तक्रारदार श्री. अरविंद निकोसे वय 56 वर्ष रा. विक्रमशिला नगर वर्धा यांचे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नागपूर येथे प्रलंबित असलेले कंत्राटदार नोंदणी प्रमाणपत्र नुतनीकरणाचे काम करण्याकरिता 30,000/- रुपये लाचेची मागणी करुन दि. 10/06/2026 रोजी सापळा कार्यवाही दरम्यान तक्रारदार यांचे कंत्राटदार नोंदणी

प्रमाणपत्र नुतनीकरण करुन दिल्याचे मोबदल्यात स्वतःच्या फायद्याकरीता 30,000/- रुपये लाच स्विकारले.

तरी, गै.अ. लोकसेवक श्री सुभाष बबन भुजबळ वय 50 वर्ष पद- मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नागपूर रा. रा. नारायणगाव ता. जुन्नर जि. पुणे ह.मु. जिवनधारा गेस्ट हाऊस, सुट क्र. 02 फुटाळा तलावाजवळ विभाग महाराष्ट्र जिवन प्राधिकरण नागपूर , यांचे कृत्य भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनीयम 1988 (संषोधन अधिनीयम 2018) चे कलम 7 प्रमाणे गुन्हा होत असल्याने माझी शासनातर्फे त्यांचे विरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

(जितेंद्र वैरागडे)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,नागपूर

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

DNYANESHWAR MUKUNDRAO BHEDODKAR (I (Inspector)) / POBN81800

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): **or** (किंवा)

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**Registered by** (नोंदणी अधिकारी)

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): DNYANESHWAR MU
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): POBN81800

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):